# Maharashtra Politics : अधिवेशनात कोणता आमदार दमदार? काँग्रेस पहिल्या स्थानी तर ठाकरे गटाने पटकावले दुसरे स्थान!



(विधान भवन)

**विशाल पाटील, प्रतिनिधी**

**मुंबई, 11 जुलै** : महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये कधी काय होईल याची नेम राहिला नाही. कोणता आमदार हा कोणत्या पक्षात सामील होईल याबद्दल अंदाज बांधणे कठीण झाले आहे. अशातच कोणत्या आमदाराने चांगलं काम केलं, याचा अहवाल समोर आला आहे. काँग्रेसचे आमदार अमिन पटेल यांनी सर्वाधिक गुण घेऊन दमदार आमदार असल्याचा मान मिळवला आहे. त्यापाठोपाठ ठाकरे गटाचे आमदार सुनील प्रभू यांनी दुसरे स्थान पटकावले आहे.

प्रजा फाऊंडेशनतर्फे दरवर्षी आमदारांच्या कामाचा रिपोर्ट प्रसिद्ध केला जात असतो. 'मुंबईतील आमदारांचे प्रगती पुस्तक 2023' 11 जुलै 2022 ला प्रकाशित करण्यात आले आहे. हिवाळी अधिवेशन 2021 ते हिवाळी अधिवेशन 2022 या कालावधीसाठीच्या या प्रगती पुस्तकातून मुंबईतील विद्यमान आमदारांनी त्यांच्या संविधानात्मक आणि वैधानिक कर्तव्यांची पूर्तता कशी केली याचे मूल्यांकन करण्यात आले आहे.

यानुसार पहिल्या 3 क्रमांकाचे गुण प्राप्त करणारे मुंबईतील आमदार अमिन पटेल (100 पैकी 82.80 गुण) आहे. तर सुनिल प्रभू (100 पैकी 81.30 गुण) आणि मनिषा चौधरी (100 पैकी 75.05 गुण) या तिसऱ्या स्थानावर आहे. नागरिकांच्या समस्यांवर प्रश्न विचारणे, अधिवेशनांना उपस्थित राहणे, कामकाजात सहभागी होणे इत्यादी आमदारांच्या संविधानात्मक आणि वैधानिक जबाबदाऱ्यांची पूर्तता करण्यामध्ये सर्वाधिक गुण प्राप्त करून पहिल्या 3 श्रेणी पटकावणारे हे आमदार आहेत. "मागील तीन वर्षांपासून COVID-19 महामारीच्या कारणामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून उपजिविका, आरोग्य, शिक्षण या मूलभूत गरजेच्या क्षेत्रांची घडी विस्कटलेली आहे. या

कसोटीच्या काळामध्ये नागरिकांचे प्रश्न समजून घेऊन सोडवणे हे लोकप्रतिनिधींचे कर्तव्य होते. शिवाय राज्यातल्या बऱ्याच महानगरपालिकांचा कार्यकालावधी संपला असून त्यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. त्यामुळे सार्वजनिक हिताच्या प्रश्नांची चर्चा केवळ राज्य विधिमंडळामध्ये शक्य होती. परंतु गेल्या काही वर्षात विधिमंडळ अधिवेशनांच्या कालावधीमध्ये कमालीची घट झालेली असून ही चिंतेची बाब आहे," असं मत प्रजा फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद म्हस्के यांनी मांडलं.

"यापूर्वीच्या विधिमंडळ सत्रांची तुलना केली असता असे दिसते की 12 व्या विधिमंडळात (हिवाळी अधिवेशन 2011 ते हिवाळी अधिवेशन 2012) अधिवेशन कालावधी 58 दिवसांचा होता, 13 व्या विधिमंडळात (हिवाळी अधिवेशन 2016 ते हिवाळी अधिवेशन 2017) अधिवेशन कालावधी 57 दिवसांचा होता, मात्र 14 व्या विधिमंडळात (हिवाळी अधिवेशन 2021 ते हिवाळी अधिवेशन 2022) तो केवळ 38 दिवसांचा होता. 12व्या ते 14व्या विधिमंडळ कालावधीच्या दरम्यान अधिवेशन दिवसांमध्ये 34% ने घट झाली," असे त्यांनी सांगितले.

"संविधानिक लोकशाहीमध्ये जेव्हा शासनाचा स्थानिक, तिसरा स्तर कार्यरत नसेल (कारण या सभागृहात निर्वाचित लोकप्रतिनिधी नाहीत), तेही मुंबईसारख्या शहरामध्ये, आणि राज्य विधिमंडळाचे कामकाजही पुरेसे दिवस चालत नसेल, तिथे नागरिकांच्या समस्या आणि जनहिताचे प्रश्न मागेच पडणार हे त्यांच्या त्यांच्या घटलेल्या संख्येवरून लक्षात येते. कामकाजाचे दिवस कमी म्हणजे जनहिताच्या मुद्द्यांवर चर्चेची संधी कमी. वरील कालावधीमध्ये 12 व्या विधिमंडळात आमदारांनी विचारलेल्या प्रश्नांची संख्या 11,214 होती परंतु 14 व्या विधानसभेत ही संख्या 67% ने कमी होऊन 3,749 प्रश्नांवर आली. अधिवेशनाचा कालावधी वाढवण्याची आणि पुरेसे दिवस अधिवेशन चालण्याची किती गरज असल्याचे यावरून लक्षात येते." असे प्रजा फाऊंडेशनच्या संशोधन व विश्लेषण विभागाचे प्रमुख योगेश मिश्रा यांनी म्हटलं आहे.

"आपल्या लोकप्रतिधींच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्याचीही गरज आहे. त्यांनी आपल्या संविधानिक कर्तव्यांची पूर्तता केली का, त्यात कोणकोणत्या त्रुटी राहिल्या हे तपासून अधिक कार्यक्षमपणे काम करण्यासाठी त्यांना प्रवृत्त केले पाहिजे. 2022 मध्ये आमदारांच्या उपस्थितीचे सरासरी गुण 94.1 होते जे 2023 मध्ये कमी होऊन 86.8 झाले आहेत, मात्र विचारलेल्या प्रश्नांची संख्या (गुण – 49.7) आणि या प्रश्नांची गुणवत्ता (गुण - 32.6) यांचे सरासरी गुण दोन्ही वर्षांसाठी साधारणपणे तितकेच आहेत," असे मिश्रा यांनी सांगितले.

**First published:** July 11, 2023, 18:18 IST

Link: Maharashtra Politics : अधिवेशनात कोणता आमदार दमदार? काँग्रेस पहिल्या स्थानी तर ठाकरे गटाने पटकावले दुसरे स्थान! – News18 लोकमत